# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

---

जळगाव दि.९ (प्रतिनिधी) भारतीय रेड क्रॉस सोसायटी, जळगाव आणि रावेर येथील श्री. ओंकारेश्वर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष व सचिव यांच्या कडून विद्यापीठाच्या वसतिगृहातील मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन वेंडींग यंत्राचे दोन संच कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या उपस्थितीत विद्यापीठास आज दि.९ जुलै रोजी देण्यात आले.

यावेळी कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, विद्यापीठ हे जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील सर्वांचे आहे. समाज विद्यापीठासाठी व विद्यापीठ समाजासाठी काम करण्यास प्रेरीत झाले आहे हे या माध्यमातून दिसून येत आहे. विद्यार्थीनींच्या आरोग्य विषयक व इतर सर्व सुविधांसाठी विद्यापीठ प्रशासन नेहमी प्रयत्नरत असते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य एल.पी.देशमुख, प्रा. जे.बी.नाईक, रेड क्रॉस सोसायटीचे चेअरमन विनोद बियाणी, उपाध्यक्ष मनी मेनन, डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी, सुभाष सांखला, उज्वला वर्मा, अनिल शिरसाळे, श्री. ओंकारेश्वर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. सुधाकर पाटील व सचिव सुभाष महाजन, प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार हे उपस्थित होते. श्री. विनोद बियाणी आणि श्री. गनी मेनन यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. श्री. सुभाष सांखला यांनी सांखला अर्बन सोसायटीकडून एक सॅनिटरी पॅड वेंडींग मशीन देण्यात येईल असे जाहीर केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील वसतिगृहात ८०० विद्यार्थिनी निवास करतात. विद्यार्थिनींच्या आरोग्याच्या दृष्टीने विद्यापीठात सॅनिटरी नॅपकिन वेंडींगचे यापूर्वी चार यंत्र बसविण्यात आले आहेत. त्यात या दोन यंत्राची भर झाली आहे. यावेळी विद्यापीठ मुलींचे वसतिगृहाचे रेक्टर डॉ.मनीषा इंदाणी, प्रा. किर्ती कमळजा, डॉ.नीता पाटील, अधिक्षक शारदा चव्हाण, संगीता पाटील, सुनीता अहिरे, श्रीमती सैंदाणे, कर्मचारी व विद्यार्थीनी उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ९ जुलै, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी